# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

(विस्तृत जाहिरात संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

विद्यापीठातील विविध विभागातील खालील शिक्षकेतर पदे विद्यापीठ निधीतून हंगामी स्वरुपात ठराविक कालावधीसाठी करार पध्दतीने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन (Online) अर्ज विद्यापीठाच्या **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर **दिनांक २१/१०/२०२१ ते दिनांक १३/११/२०२१** या कालावधीत मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम व वेतन | पदाचा गट | पदाचा कालावधी | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **को-ऑर्डिनेटर (परीक्षा ऑटोमेशन)**<br><br>दरमहा एकत्रित वेतन : रु.१,००,०००/- | अ | पाच वर्षे | ०१ | खुला - १ (Open to all) | a) **Qualifications:**<br>Ph.D Degree with Post Graduate in Engineering / Technology with at least 55 % marks or its equivalent grade from a recognized University / Institute.<br>b) **Experience:**<br>At least 15 years experience in teaching / research / automation work in IT industry.<br>Candidate should have performed examination related work for at least 05 years.<br>The candidate must be well acquainted with education systems incorporating credit / CBCS / MPEC/ interdisciplinary programs, credit transfer and joint certifications, provisions in NEP.<br>**Desirable Qualifications and Experience:**<br>a. Experience in- on demand examination, proctored online exams, use of multimedia and communication technology.<br>b. Familiar with the on-screen evaluation of answer books, generation of question papers from question banks, various stages for the result processing and ordinances used during the result processing. |

| अ. क्र. | पदनाम व वेतन | पदाचा गट | पदाचा कालावधी | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | c. Proficient in management with interpersonal skills.<br>d. In depth knowledge of result processing, application of ordinance / rules. |
| २. | **विशेष कार्याधिकारी (माध्यम)**<br><br>दरमहा एकत्रित वेतन : रु.७०,०००/- | अ | चार वर्षे | ०१ | खुला - १ (Open to all) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास कम्युनिकेशन/मास रिलेशन/ जर्नालिझम या विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. जनसंपर्क अधिकारी अथवा समकक्ष पदाचा किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>अथवा<br>प्रसारमाध्यमांमधील व्यवस्थापकीय पदाचा/वार्तांकनाचा पूर्णवेळ कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव. |
| ३. | **उद्यान अधीक्षक**<br><br>दरमहा एकत्रित वेतन : रु.६०,०००/- | अ | पाच वर्षे | ०१ | खुला - १ (Open to all) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची M.Sc.(Horticulture) पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. उद्यान विकास व देखभाल क्षेत्रातील पर्यवेक्षणाचा किमान पाच वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ४. | **Chief Science Education Officer**<br><br>वेतनस्तर : एस-१६ (४४,९०० - १,४२,४००) | ब | पाच वर्षे | ०१ | खुला - १ (Open to all) | Ph.D in any branch of science or engineering with minimum 5 years of experience or 10 years of experience after M.Sc. or 7 years after M.Tech. in teaching science or mathematics in school or junior college level, minimum two years of which is in design, development and construction of kits / demonstration experiments / science exhibits.<br>**Desirable qualifications :**<br>i. Demonstrable abilities in innovative development in exploratory laboratory at school level from 4th to 12th standard.<br>ii. Experience in conceiving, design and developing models showing experiments to illustrate concepts in science. |

| अ. क्र. | पदनाम व वेतन | पदाचा गट | पदाचा कालावधी | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | iii. Ability of science communication including local language i.e. Marathi and English. |
| ५. | **Senior Science Education Officer**<br><br>वेतनस्तर : एस-१५<br>(४१,८०० - १,३२,३००) | ब | पाच वर्षे | ०१ | खुला - १<br>(Open to all) | M.Sc. with 4 years of experience or M.E. / M.Tech. with 3 years of experience or B.E. with 5 years of experience in teaching science or mathematics in school or junior college level, minimum two years of which is in design, development and construction of kits / demonstration experiments / science exhibits.<br><br>**Desirable qualifications :**<br>i. Demonstrable abilities in innovative development in exploratory laboratory at school level from 4th to 12th standard.<br>ii. Experience in conceiving, design and developing models showing experiments to illustrate concepts in science.<br>iii. Ability of science communication including local language i.e. Marathi and English. |
| ६. | **Junior Science Education Officer**<br><br>वेतनस्तर : एस-१४<br>(३८,६०० - १,२२,८००) | क | पाच वर्षे | ०१ | खुला - १<br>(Open to all) | M.Sc. with 2 years of experience or B.E. with 3 years of experience or B.Sc. with 4 years of experience in teaching science or mathematics in school or junior college level, minimum two years of which is in design, development and construction of kits / demonstration experiments / science exhibits.<br><br>**Desirable qualifications :**<br>i. Demonstrable abilities in innovative development in exploratory laboratory at school level from 4th to 12th standard. |

| अ. क्र. | पदनाम व वेतन | पदाचा गट | पदाचा कालावधी | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ii. Experience in conceiving, design and developing models showing experiments to illustrate concepts in science.<br>iii. Ability of science communication including local language i.e. Marathi and English. |
| ७. | **Junior Engineer (NCFRR)**<br><br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | क | पाच वर्षे | ०१ | खुला - १ (Open to all) | B.E.(Electronics) with 2 to 5 years experience **OR** Diploma in Electronics with 3 to 6 years experience in Accelerator **OR** Power Electronics **OR** Instrumentation Maintenance and Computer Interfacing.<br>Candidates should have adequate knowledge of computer programming. |

## सर्वसाधारण सूचना

- **ऑनलाईन अर्ज करण्याच्या महत्वाच्या तारखा :**

  १. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी : गुरुवार, दिनांक २१/१०/२०२१ ते शनिवार, दिनांक १३/११/२०२१ पर्यंत.

  २. ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यानंतर त्याची प्रिंटआऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नजीकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वत:चे छायाचित्र चिकटवून गुरुवार, दिनांक १८/११/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ४११ ००७ येथे जमा करण्यात यावे.

  ३. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

- **ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत :**

  १. उमेदवाराने विद्यापीठ संकेतस्थळावरील जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

  २. उमेदवाराने अर्ज (Hard Copy) विद्यापीठात सादर करतांना शैक्षणिक, अनुभव आणि अन्य प्रमाणपत्रे व अर्ज शुल्काच्या चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

  ३. ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना सर्वप्रथम संकेतस्थळावर जाऊन स्वतःची नोंदणी (Create Account) करावयाची आहे.

५. संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करतांना उमेदवाराने त्याची वैयक्तिक माहिती अचूकरित्या भरुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा.

६. Login मध्ये युजर नेम व पासवर्ड टाकल्यावर अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती अचूकरित्या दिलेल्या क्रमाने भरावी.

७. "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या शीर्षकावर जाण्यापूर्वी अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. त्यानंतर उमेदवारास वरील माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

८. अर्जाचे शुल्क खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु.४००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.२००/-इतके आहे. "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या लिंकवर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने त्यास ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदासंदर्भातील माहिती भरल्यानंतर अर्जाच्या शुल्काचे तीन प्रतीत तयार झालेले चलन बँक ऑफ महाराष्ट्र **(Bank of Maharashtra)** अथवा एच.डी.एफ.सी. **(HDFC Bank)** च्या कोणत्याही शाखेत रोख भरण्यात यावे. तसेच अर्जाचे शुल्क डेबीट / क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाईन पध्दतीने सुध्दा भरता येतील. तद्नंतरच अर्ज भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर अर्जाची प्रिंटआऊट काढावी.

९. ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकानंतर जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या पदाकरिता अर्ज (Apply) करता येणार नाही.

१०. वरील पदांसाठी फक्त विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

- **अर्ज शुल्क :**

  १. खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु. ४००/- (अक्षरी रुपये चारशे फक्त)

  २. मागासवर्गीय उमेदवारांसाठी (सर्व प्रवर्गातील) रु.२००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त)

  ३. सदर अर्जाचे शुल्क हे ना परतावा राहील.

- **वयोमर्यादा :**

  १. गट 'अ' मधील पदासाठी किमान ३० वर्षे आणि कमाल ३८ वर्षे. (मागासवर्गीय उमेदवारांना कमाल वयामध्ये पाच वर्षे शिथीलक्षम) तथापि को-ऑर्डिनेटर (परीक्षा ऑटोमेशन) या पदासाठी किमान ५० वर्षे आणि कमाल ६० वर्षे.

  २. गट 'ब' मधील पदासाठी किमान २५ वर्षे आणि कमाल ३८ वर्षे. (मागासवर्गीय उमेदवारांना कमाल वयामध्ये पाच वर्षे शिथीलक्षम)

  ३. गट 'क' मधील पदासाठी किमान १८ वर्षे आणि कमाल ३८ वर्षे. (मागासवर्गीय उमेदवारांना कमाल वयामध्ये पाच वर्षे शिथीलक्षम)

  ४. सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठे आणि अशा विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत सेवकांसाठी उच्चतम वयोमर्यादेची अट लागू नाही.

५. खुला तसेच राखीव प्रवर्गातील अपंग उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेची अट वयाच्या ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.

६. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ०१ जुलै, २०१६ च्या शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ मधील तरतूदीनूसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी राखीव असलेल्या पदांसाठी खेळांडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन वयोमर्यादा विहित वयोमर्यादेपेक्षा पाच वर्षे शिथिलक्षम राहील.

- **अपंगासाठीचे आरक्षण :**

१. अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. त्या संबंधीचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा केंद्र / राज्य शासनाने यासाठी स्थापन केलेली मंडळे यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. फक्त कायम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांनाच अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

३. अपंग प्रवर्गासाठी नमूद केलेले आरक्षण अंध / अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्थिव्यंग या क्रमाने अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **मागासवर्गीयांचे आरक्षण :**

१. जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

२. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा मागासवर्गाचा / अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (आर्थिक वर्ष २०२०-२१ चे दिनांक १ एप्रिल, २०२१ नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

३. उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गातील तसेच खुल्या गटातील महिला, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांना वयोमर्यादा, आरक्षण या सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.

४. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून नियुक्ती दिली जाईल. नियुक्ती दिल्यावर जात पडताळणीसाठीचा प्रस्ताव हा पडताळणी समितीकडे सादर केल्याची पोहोच कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम मधील तरतुदीनुसार विमुक्ती जाती (अ), भटक्या जमाती (ब),(क),(ड) प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **महिलांसाठीचे आरक्षण :**

१. भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

२. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गाचा दावा करणा-या आणि खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवार तसेच अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा आरक्षणाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (आर्थिक वर्ष २०२०-२१ चे दिनांक १ एप्रिल, २०२१ नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :**

१. शासनाने शासकीय विभागातील गट - अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

२. प्रतिज्ञापनात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार विद्यापीठ सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

- **लेखी परीक्षा :**

**अ.क्र.१, २ व ३ च्या पदांसाठी :-**

- **लेखी परीक्षा (चाळणी परीक्षा)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **परीक्षेचे स्वरुप** | : | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | | |
| **परीक्षेचे माध्यम** | : | मराठी / इंग्लिश | | |
| **एकूण प्रश्न** | : | १५० | | |
| **गुण** | : | ३०० | | |
| **वेळ** | : | ३ तास | | |
| **परीक्षा पध्दती** | : | ऑनलाईन / ऑफलाईन परीक्षा | | |
| **विषय** | : | १. मराठी | : ६० | गुण |
| | | २. इंग्लिश | : ६० | गुण |
| | | ३. सामान्य ज्ञान (General Knowledge) | : ६० | गुण |
| | | ४.सांख्यिकीय क्षमता (Numerical Ability) | : ६० | गुण |
| | | ५.बौध्दिक चाचणी (Intelligence Test) | : ६० | गुण |

- **मुलाखत गुण** : १००

टीप :

१) लेखी परीक्षा ही मुलाखतीसाठी पात्र उमेदवार ठरवण्यासाठीची चाळणी परीक्षा असेल. त्यामुळे एका रिक्त पद संख्येसाठी २५ अथवा २५ पेक्षा कमी उमेदवारांचे अर्ज छाननीअंती पात्र झाल्यास त्या पदासाठी सदर चाळणी परीक्षेचे आयोजन करण्यात येणार नाही.

२) उमेदवारांच्या लेखी (चाळणी) परीक्षेतील गुणानुक्रमानुसार मुलाखतीसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांची संख्या खाली नमूद केल्याप्रमाणे असेल :

| | **रिक्त पदांची संख्या** | **मुलाखतीसाठी बोलावयाच्या उमेदवारांची संख्या** |
|---|---|---|
| १. | १ | ३ |
| २. | २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ३. | ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते. |
| ४. | १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५. | ५० किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के |

कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांच्याच मुलाखती घेण्यात येतील.

३) लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आल्यास मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या पात्र उमेदवारांची संख्या निश्चित करताना लेखी परीक्षेमध्ये गुणानुक्रमे अंतिम स्थानावर एकाहून अधिक उमेदवार असल्यास त्या सर्व उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलाविण्यात येईल.

४) लेखी (चाळणी) परीक्षेचे आयोजन न केल्यास उमेदवारांच्या कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णय क्र.प्रानिमं १२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ नुसार मुलाखतीमध्ये ज्या उमेदवारांचे समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल :-

१. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

२. समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु.क्र.१ नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

३. वरील अनु.क्र.१ व २ या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४. वरील अनु.क्र.१, २ व ३ या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

(टीप :- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये गठित करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी

मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय.)

६) लेखी परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्यामुळे लेखी परीक्षेचे गुण अंतिम गुणवत्ता यादीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

७) उमेदवारांना मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे पदनिहाय व प्रवर्गनिहाय निवडसूची तयार करुन गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांची संबंधित पदावर नियुक्ती करण्यात येईल.

**अ.क्र. ४, ५, ६ व ७ च्या पदांसाठी :-**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **लेखी परीक्षेचे स्वरुप** | : | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | | |
| **परीक्षेचे माध्यम** | : | मराठी / इंग्लिश | | |
| **एकूण प्रश्न** | : | १०० | | |
| **एकूण गुण** | : | २०० | | |
| **वेळ** | : | २ तास | | |
| **परीक्षा पध्दती** | : | ऑनलाईन / ऑफलाईन परीक्षा | | |
| **विषय** | : | १. मराठी | : ५० | गुण |
| | | २. इंग्लिश | : ५० | गुण |
| | | ३. सामान्य ज्ञान (General Knowledge) | : ५० | गुण |
| | | ४.बौध्दिक चाचणी (Intelligence Test) | : ५० | गुण |

**टीप :**

१) लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त केलेले उमेदवारच निवडीस पात्र ठरतील.

२) कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांची त्यांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे पदनिहाय व प्रवर्गनिहाय निवडसूची तयार करुन गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांची संबंधित पदावर नियुक्ती करण्यात येईल.

३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णय क्र.प्रानिमं १२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ नुसार मुलाखतीमध्ये ज्या उमेदवारांचे समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल :-

१. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

२. समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु.क्र.१ नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

३. वरील अनु.क्र.१ व २ या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४. वरील अनु.क्र.१, २ व ३ या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

(टीप :- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये गठित करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय.)

- **लेखी परीक्षेसंबंधी सूचना :**

१) लेखी परीक्षांसंदर्भातील माहिती **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर त्या-त्या वेळी प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी.

२) निवड प्रक्रियेच्या त्या-त्या टप्प्यासाठी उमेदवारांची यादी त्या-त्या वेळी **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. यासाठी विद्यापीठ कार्यालयात दूरध्वनीद्वारे / प्रत्यक्ष संपर्क साधू नये.

३) उमेदवाराची लेखी परीक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

४) कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित झाल्यानंतर पुढील प्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५) लेखी परीक्षेची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. यासाठी कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

६) उमेदवार भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर गैरहजर राहिल्यास अंतिम निवडीसाठी अपात्र ठरेल. याबाबत कोणतीही विनंती/तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७) परीक्षेकरिता अथवा अभ्यासक्रमाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे संदर्भ पुस्तक विद्यापीठातर्फे पुरविण्यात येत नाही. त्यामुळे अशा स्वरुपाच्या कोणत्याही चौकशीची दखल घेण्यात येणार नाही व अशा चौकशीच्या संदर्भातील पत्रे कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरी दाखल करण्यात येईल.

८) परीक्षेच्यावेळेस परीक्षा-कक्षात किंवा परीक्षा-केंद्राच्या परिसरात, तसेच मुलाखतीच्यावेळी विद्यापीठाच्या कार्यालयात किंवा परिसरात भ्रमण-ध्वनी (मोबाईल फोन) अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणारा उमेदवार अपात्रतेच्या कारवाईस पात्र ठरेल.

९) लेखी परीक्षेच्या गुणांची पडताळणी अथवा फेरतपासणी करण्याबाबतची निवेदने कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.

- **इतर सूचना :**

१) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वय ग्राहय धरण्यात येईल.

२) अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अंशकालीन, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

३) शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी या भरती प्रक्रियेला लागू राहतील.

४) पात्र उमेदवाराची निवड झाल्यास विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयांमधील आस्थापनांमध्ये नियुक्ती अथवा बदली करण्यात येईल.

५) पात्र उमेदवाराची निवड झाल्यास प्रथमतः एक वर्ष कालावधीकरिता नियुक्ती करण्यात येईल. तद्नंतर प्रथम एक वर्ष कालावधीतील गोपनीय अहवाल आणि निश्चित करण्यात आलेल्या कर्तव्य व जबाबदाऱ्याच्या आधारे पुढील एक वर्ष कालावधीकरिता मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल. तसेच दोन वर्षांच्या कालावधीतील गोपनीय अहवाल आणि निश्चित करण्यात आलेल्या कर्तव्य व जबाबदाऱ्याच्या आधारे पुढील कालावधीकरिता मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

६) जाहिरातीमधील एकत्रित वेतनावरील पदांना दरवर्षी ६% वेतनवाढ देण्यात येईल. वेतनस्तर व वेतन बॅण्ड मधील पदांना नियमानुसार वेतनवाढ देण्यात येईल. तसेच शासनमान्य पदावर कार्यरत असलेल्या सेवकांना लागू असलेले इतर कोणतेही लाभ व भत्ते लागू राहणार नाहीत.

७) अर्जदारांनी नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची साक्षांकित प्रत, विशेषतः महिला उमेदवारांनी नावातील बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासन राजपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

८) या भरती प्रकियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी. यासंबंधी विद्यापीठ कार्यालयात दूरध्वनीद्वारे / प्रत्यक्ष संपर्क साधू नये.

९) अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण या बाबी विचारात घेऊन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज ऑनलाईन (Online) भरावा.

१०) ज्या राखीव प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे, त्याच राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज करावेत. (जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आणि जातवैधता प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.) महाराष्ट्र राज्याबाहेरील रहिवासी असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज केल्यास ते खुल्या प्रवर्गात गणले जातील.

११) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

अ) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र. ६६/२०११/ई-१०, दि. २७ जून, २०११ नुसार ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

ब) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणातदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

उपरोक्त बाबींपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

१२) सध्या सेवेत असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयप्रमुखांच्या परवानगीने भरावे व नियोक्त्याचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र व वेतनचिठ्ठी / वेतन प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१३) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. प्रशासन २०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक २० जुलै, २००२ आणि शासन निर्णय क्र. प्रशासन २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार

अर्ज करणा-या उमेदवारांपैकी निवड झालेल्या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकाच्या दिवसापासून २ वर्षांच्या आत सादर करणे आवश्यक राहील. तसेच माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) यांच्या शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ नुसार संगणक अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

१४) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस / मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी विद्यापीठ निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता अशा उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१५) मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास अथवा संकेतस्थळावरील भरती प्रक्रियेसंदर्भात प्रसिध्द केलेल्या सूचना व माहितीची उमेदवाराने नोंद न घेतल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

१६) परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे आणि अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासन हे स्वतःकडे ठेवत आहे. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

१७) ज्या उमेदवारांनी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र / सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण कार्यालय / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी / जिल्हा सैनिक बोर्ड कार्यालयात नांवे नोंदविली आहेत अशा उमेदवारांनीदेखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणातंर्गत येणा-या उमेदवारांनी देखील अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१८) अर्ज स्विकारणे किंवा नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१९) जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

जाहिरात क्रमांक : २८
दिनांक : २१.१०.२०२१

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
कुलसचिव